मा. जिल्हाधिकारी, पालघर यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा निर्यात प्रचालन समिती बैठक दि.२४.०३.२०२३ रोजी संपन्न् झालेल्या जिल्हा निर्यात प्रचालन समितीच्या बैठकीचे इतिवृत्त

---

दिनांक २४/०३/२०२३ रोजी दुपारी १२.३० वाजता पालघर जिल्हयासाठी निर्यात प्रचालन समिती बैठक मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर, जिल्हा पालघर येथे मा. जिल्हाधिकारी, पालघर यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली होती. सदर बैठकीसाठी खालील प्रमाणे पदाधिकारी उपस्थित होते.

| क्र. | अधिकारी / सदस्य यांचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | Shri. Govind Maruti Bodake | Hon'ble Collector, Palghar |
| २ | Shri. Dinesh Patil | Dist. Agriculture Officer, Palghar |
| ३ | Shri. Dinesh Patil | Assistant Commissioner, Fisheries Dept., Palghar |
| ४ | Shri. Mukesh Chandran | Station Manager, Palghar |
| ५ | Shri. Soni | Station Manager, Palghar |
| ६ | Shri. Pranil Save | Chiku Cluster, Talasari |
| ७ | Shri. Sunil Akrekar | Fish Cluster, Vikramgad |
| ८ | Shri. Yadnesh Save | Chiku Exporter |
| ९ | Shri. Devendra Raut | Chiku Exporter |
| १० | Shri. Sailesh Raut | Chiku Exporter |
| ११ | Shri. Prashant Bhoir | Manager, Vasai Taluka Co-op. Indl. Estate, Vasai. |
| १२ | Shri. Khanvilkar | Chairman, Palghar Taluka Co-op. Indl. Estate, Vasai. |
| १३ | Shri. Gogri | Chairman, TIMA, Boisar. |
| १४ | Shri. Narvekar | Achhad Inustrial Association, Talasari |
| १५ | Shri. Sankhe | Palghar Manufacturer association, Palghar |
| १६ | Smt. V.B. Sone | General Manager, District Inds. Centre, Palghar |

श्रीमती व्हि.बी. सोने, महाव्यवस्थापक, जिउके पालघर यांनी District Export Action Plan यांचे सविस्तर सादरीकरण करुन चर्चा करण्यात आली. पालघर जिल्ह्याकरीता ODOP अंतर्गत चिक्कू उत्पादन व Marine Products हे दोन असल्याबाबत सभेस सांगितले तसेच चिक्कू प्रक्रिया उद्योगांस चालना मिळणेसाठी राज्य शासनाच्या समूह विकास योजनेंतर्गत मौजे ब्राम्हणगांव, पोष्ट बोर्डी ता. तलासरी जि. पालघर येथे व मरीन प्रोडक्ट्स उद्योगांस चालना मिळणेसाठी राज्य शासनाच्या समूह विकास योजनेंतर्गत ता. विक्रमगड, जिल्हा पालघर येथे सामायिक सुविधा केंद्र स्थापनेचे कामकाज सुरु करण्यांत आले असून या

माध्यमातून उत्पादन व निर्यात वाढीसाठी प्रयत्न होणार असल्याने उद्योजकांनी या वस्तूचे उत्पादनासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. याबाबत उपस्थित फिश क्लस्टरच्या सदस्यासोबत मा. अध्यक्षांनी सविस्तर चर्चा केली.

फिश क्लस्टर अंतर्गत Marine Products उद्योगांना निर्यात चालना देण्यासाठी MCED (एक दिवसीय Capasity Building and Trust Building), MPEDA (तीन दिवसीय Marketing and selling Techniques), CIEF (तीन दिवसीय Quality aspects and standard) या विषयांवर सदर संस्थामार्फत Soft Intervention अंतर्गत प्रशिक्षण देण्यात आले. तसेच, चार दिवसीय CIFNET, कोची व NIFPHATT, ऐरणाकुलम, केरळ येथे प्रगत तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण नियोजित आहे असे फिश क्लस्टरचे अध्यक्ष श्री. सुनिल आक्रेकर यांनी मा. अध्यक्षांना सांगितले.

मा. जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक १४.०२.२०२३ रोजीच्या जिल्हा निर्यात प्रचालन समिती मध्ये भाडे तत्वावरील रेल्वे स्टॉल आणि किसान रेल्वे या संदर्भात केलेल्या सुचनानुसार सविस्तर प्रस्ताव संबंधित कार्यालयास त्यानुसार दिनांक १३.०३.२०२३ रोजी अग्रेषित केले होते. सदर प्रस्तावाबाबत रेल्वे विभाग व फिश क्लस्टर सदस्य यांच्यात चर्चा झाली. तसेच किसान रेल्वे संदर्भात रेल्वे विभागाने त्यांच्या वरिष्ठ पातळीवर पत्रव्यवहार झालेला आहे. याबाबत रेल्वेविभागातील अधिकाऱ्यांनी मा. अध्यक्षांना माहिती दिली.

पालघर जिल्ह्याच्या Export Action Plan वर झालेल्या चर्चेअंती पालघर जिल्ह्यातील Iron and Steel Products, Screw & Bolts, Flanges & Stainless Steel, House Hold Articles of Stainless steel यांचे सध्याचे निर्यातीतील प्रमाण बघता भविष्यात आणखीन वाढ शक्य आहे ते प्रमाण वाढवण्यासाठी DGFT आणि EEPC यांना प्रचालन कॅम्प आयोजित करण्याबाबत सविस्तर प्रस्ताव संबंधित कार्यालयास अग्रेषित करण्याबाबत मा. अध्यक्षांनी निर्देशित केले.

मा. जिल्हाधिकारी, पालघर यांनी औद्योगिक क्षेत्रासाठी मरीन प्रॉडक्टस व कृषी प्रक्रियेंतर्गत चिकू उत्पादन या एक जिल्हा एक उत्पादन या निवड करण्यांत आलेल्या वस्तूंचे उत्पादनासाठी जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात वाव असल्यामुळे उद्योजक/ उत्पादक यांनी सदर वस्तूंचे उत्पादनासाठी औद्योगिक गुंतवणूकीचे माध्यमातून प्रयत्न करुन या वस्तूंची जास्तीत जास्त निर्यातीवाढीसाठी प्रयत्न करण्यांचे आवाहन सर्व उपस्थित उद्योजक/ निर्यातदार व औद्योगिक संघटना यांना केले. चिक्कू उत्पादन व Marine Products बाबत data analysis - Export करणाऱ्या उद्योजकांची यादी या कार्यालयास सादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्षांनी संबंधितांना दिले.

शेवटी श्रीमती व्हि.बी. सोने, महाव्यवस्थापक, जिउके पालघर यांनी सदरची बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

महाव्यवस्थापक, जिउकें पालघर
तथा
सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती

मा. जिल्हाधिकारी, पालघर.
तथा
मा. अध्यक्ष जिल्हा निर्यात प्रचालन समिती

E:\export conclave 2\DEPC-24-03-2023= Export - ODOP.doc